| MHKO190003482023 | निशाणी क्र.२६ खालील आदेश<br>नियमित दिवाणी दावा क्र.१३५/२०२३<br>*श्रीपतराव गोविंद किल्लेदार व इतर वि.. दिनकर गणपती किल्लेदार (मयत ) तर्फे वारस*<br>(दिनांकः०८/१०/२०२५) |
|---|---|

१. प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार कैफियत व म्हणणेमध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांनी त्यांच्या अर्जामध्ये असे कथन केले की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा त्यांचे विरुध्द हक्कज्ञापनासाठी व कायममनाईसाठी दाखल केलेला आहे. त्यांनी प्रस्तुत कामामध्ये कैफियत व म्हणणे दाखल केले असुन त्यामध्ये नजरचुकीने व अनावधानाने दाव्यातील कथने नाकारण्यासंदर्भातचा मजकुर समाविष्ट करणेचे राहुन गेले आहे. त्याअनुषंगाणे प्रतिवादी प्रस्तुत अर्जात नमुद केलेप्रमाणे त्यांच्या कैफियतीमध्ये दुरूस्ती करुन परिच्छेद समाविष्ट करु इच्छीत आहेत.

३. वादीतर्फे नि.क्र.२८ कडे त्यांचे म्हणणे दाखल करुन असे कथन केले की, प्रस्तावित दुरूस्तीचा मजकुर यापूर्वी कैफियतीमध्ये का नमुद करता आला नाही याबाबत कसलेही योग्य व संयुक्तीक कारण वा स्पष्टीकरण प्रस्तुत अर्जात नमुद केलेले नाही. तसेच प्रतिवादी यांची कथने मुळ कैफियतीमधील कथनांशी विसंगत आहेत. केवळ सदरचे काम लांबणीवर टाकणेच्या हेतुन प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. शेवटी वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

४. दोन्ही बाजुतर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने प्रस्तुतचा दावा हक्कज्ञापन व कायम मनाई आदेश होवुन मिळणेकरीता दाखल केला आहे. प्रतिवादींनी त्यांची

कैफियत व म्हणणे दाखल केले आहे. असे असले तरी अद्याप प्रस्तुत प्रकरणात संपरिक्षा सुरू झालेली नाही. तसेच प्रतिवादी मागत असलेली दुरूस्ती ही केवळ वादीची दाव्यातील कथने नाकारण्याच्या अनुषंगाणे असल्याचे दिसुन येते. प्रतिवादी समाविष्ट करु इच्छीत असलेल्या मजुकरामुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट गुणावगुणांवर दाव्याचा अंतिम निर्णय देणेस मदतच होणार आहे. परिणामी, अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**– आदेश –**

१. प्रस्तुत दुरूस्ती अर्ज निशाणी क्र.२६ मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादीने अर्जात नमुद प्रमाणे त्याच्या कैफियतीमध्ये दुरुस्ती करुन पुढील तारखेपर्यंत दुरुस्त कैफियतीच्या प्रती अभिलेखावर सादर कराव्यात.

RAJENDRA DHANAJI SHINDE
Digitally signed by RAJENDRA DHANAJI SHINDE
Date: 2025.10.09 11:03:14 +0530

**(आर.डि.शिंदे)**

दिनांकः०८/१०/२०२५ — दिवाणी न्यायाधीश क. स्तर,राधानगरी.